म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय बा. वा.
दा.क्र. 9256



कांहींतरी नवेंच करा!

BVBK-0401256
BVBK-0401256

# वीरपत्नी राणी दुर्गावती

# वीरपत्नी दुर्गावती

काहींतरी नवेंच करा : १६

अंबादास देवळे

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
[illegible] विभाग
वा. क. ९२५६ दिनांक २०।५।५९
विषय बा. वा. क. .........

BVBK-0401256
BVBK-0401256



पन्नास नये पैसे

वोरा अँण्ड कंपनी,
पब्लिशर्स प्रा. लि.
मुंबई २.



भारतीय स्त्रियांची परंपरा ही एक अत्यंत तेजस्वी आणि स्फूर्तिदायक परंपरा आहे. ज्या धर्मानें आपलें जीवन बनलें, त्या हिंदु-आर्यस्त्रीधर्माप्रमाणें वैधव्यांत आपली वागणूक एकाद्या विरक्त तपस्विनीप्रमाणें ठेवणें आणि त्याचवेळीं कुशलतेनें राज्यकारण चालविणें; प्रजाहितासाठीं तत्पर असणें; आणि वेळप्रसंग पडल्यास समरांगणावर वीरपत्नी, वीरमाता म्हणून तितक्याच प्रखरतेनें तलवार गाजविणें; ही सामान्य गोष्ट नव्हे.—झांशीची महाराणी लक्ष्मीबाई, अहिल्याबाई होळकर किंवा वीरपत्नी राणी दुर्गावती हे भारतीय स्त्रियांचे दैदीप्यमान आदर्श आहेत.

श्री : १६९ : २ [ ९-६२ ]

::


© १९५९
वोरा ॲण्ड कंपनी,
पब्लिशर्स प्रा. लि.


::

प्रकाशक :
अ. ल. गाडगीळ
वोरा ॲण्ड कंपनी,
पब्लिशर्स प्रा. लि. करितां
३, राउंड बिल्डिंग,
काळबादेवी रस्ता,
मुंबई २.

::

आवृत्ति दुसरी : १९६२

::

मूल्य ५० नये पैसे

::

मुद्रक :
अनंत जे. शाह
लिपिका प्रेस,
कुर्ला रोड, अंधेरी,
मुंबई ५९.

# वीरपत्नी राणी दुर्गावती

卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐

भारत हा सर्वच दृष्टींनीं भाग्यवान देश आहे. ह्याच्या इतिहासाचीं अर्ध्याहून अधिक पानें रक्तानें लिहिलीं गेलीं आहेत. तें रक्त केवळ पुरुषांनींच रणांगणावर सांडलें असें नव्हे, तर त्यांच्याइतकेंच धैर्य, त्याग, स्वाभिमान आणि देशाभिमान येथील स्त्रियांनीं दाखविला आणि आपल्या कीर्तीचें स्वतंत्र दालन उघडलें. भारत हा असा एक देश आहे कीं, ज्यांत शुद्ध सनातन धर्मप्रमाणें शुद्ध, पवित्र आणि पतिव्रता स्त्रिया जन्मल्या. आजहि ही परंपरा चालू आहे. भारतीय धर्म-संस्कृतीचा ठसा आमच्या माता-भगिनींच्या हृदयावर फार खोलवर उमटलेला आहे. आणि त्यांतून त्यांचें उज्ज्वल व मांगल्यपूर्ण चारित्र्य प्रकट झालें आहे. केवळ स्त्रीसुलभ गूणच त्यांनीं आपल्या अंगीं बाणविले असें नव्हे; तर पुरुषोचित गुणांतहि त्या मागें राहिल्या नाहींत. समरशास्त्र आणि कला यांमध्येंहि त्यांनीं आपली निपुणता प्रकट केली. कांहींनीं तर मोठमोठ्या सम्राटांना आपल्या तलवारींचें पाणी पाजलें, बुद्धीची चमक दाखविली आणि पराभवाचा कलंक तोंडाला फांसून पळतां भुई थोडी केली !

चारशें वर्षांपूर्वी अशाच एका महिलेनें अकबरासारख्या सम्राटाविरुद्ध झुंज दिली. ती झुंज खरोखरीच अलौकिक होती. त्या समरांत तिनें पराक्रमाची शर्थ केली. विलक्षण कणखरपणा दाखविला. आणि अखेर धारातीर्थी देह ठेविला, तोहि वीरोचित मरण पत्करून आणि स्त्रीजातीची मान उन्नत राहील अशाच रीतीनें. त्या स्त्रीचें नांव राणी दुर्गावती.

हल्लीं ज्याला आपण मध्यप्रदेश म्हणून संबोधतों त्या विभागांत पूर्वी बुंदेलखंड नांवाचा प्रदेश होता. या प्रदेशावर चंदेल नांवाचें राजपूत घराणें राज्य करीत होतें. त्यांची राजधानी महोबा ही होती. याच चंदेल वंशांत किरतराय ऊर्फ कीर्तिराज नांवाचा राजा होऊन गेला. त्याला जी एकुलती एक मुलगी होती तिचेंच नांव दुर्गावती.

**देवानें दिलेलें अमाप रूप**

दुर्गावतीला देवानें जें रूप दिलें होतें त्यांत मुळींच कमतरता केली नव्हती. पिवळ्या गुलाबासारखी देहकांति, माशासारखे टपोरे आणि तेजस्वी डोळे, अवयवांतील प्रमाणबद्धता, असें रूप; आणि त्यालाच शोभेशी ममताळू वृत्ति. यामुळें दुर्गावती सर्वांची लाडकी झाकी असली तर नवल नाहीं. अशा सुरेख कन्येवर राजाचें आत्यंतिक प्रेम होतें हेंहि तितकेंच साहजिक. तिच्या लालनपालनांत कुठलीहि उणीव त्यानें पडूं दिली नव्हती. पण फुलासारखी नाजूक

आणि कोमल दुर्गावती कर्तृत्वानें लोखंडापेक्षांहि कणखर व मजबूत असावी अशी राजा किरतरायची महत्त्वाकांक्षा होती. दिवसांमागून दिवस उलटले. एका ऋतूनें दुसऱ्या ऋतूला मागें टाकलें. महिन्यांच्या कित्येक प्रदक्षिणा झाल्या. आणि वर्षांचे दगड जसजसे मागे पडले तसतशी दुर्गावती मोठी होऊं लागली.

**‘होईन तर वीरांगनाच’**

राजा किरतरायनें दुर्गावतीच्या शिक्षणाकडे जातीनें लक्ष घातलें होतें. त्यानें तिच्या शिक्षणाची सर्व प्रकारची व्यवस्था केली होती. परंतु आपण निरनिराळ्या शास्त्रांचा अभ्यास करावा, नृत्यकलेंत नैपुण्य मिळवावें आणि संगीताच्या सुरेल सुरसागरांत बुडून जावें, अशी मनीषा दुर्गावतीच्या मनांत कधींहि डोकावली नव्हती. ग्रंथवाचनाकडे तर तिचें मन कधींच ओढलें गेलें नव्हतें. उलट राजवाड्यांतील शिपायांच्या हातांतल्या तलवारी, भाले आणि धनुष्य-बाण पाहून तिनें स्वतःविषयीं निराळींच चित्रें मनांत रेखाटलीं होतीं. युद्धकलेंतलीं सर्व अंगें-उपांगें जाणून घ्यावींत, त्यांत असामान्य यश मिळवावें आणि वीरांगना म्हणून लौकिक कमवावा, असें चित्र तिनें स्वतःच्या अंतःकरणावर सुरवातीपासून कोरलें होतें. दुर्गावती जितकी रूपवान होती तितकीच धाडसी होती, शूर होती. घोड्यावर बसणें, दांडपट्टा खेळणें इत्यादि गोष्टींचें शिक्षण तिनें कसून

घेतलें होतें. युद्धाच्या कथा तिला फार आवडायच्या; आणि त्या ऐकतांना तिचें मन फुलून जायचें. अनेक वीरपुरुषांच्या युद्धकथा तिच्यासमोर अगदीं ताज्या होत्या. त्या वारंवार ऐकून आपणहि अशोच मर्दुमकी गाजवायची असें स्वप्न तिनें उराशीं बाळगलें होतें व तें साकार करायला तिनें विलंब लावला नव्हता. अगदीं थोड्या काळांत ती धनुर्विद्येंत पारंगत झाली. तलवार-भाला-कट्यारीशों तिचा जिवाभावाचा स्नेह जडला. आणि ती त्यांची कायमची मैत्रीण झाली.

आणखी कांहीं वर्षें संपलीं. दुर्गावतीनें बाल्यावस्थेंतून तारुण्यांत प्रवेश केला. आतां एखाद्या रूपसंपन्न अप्सरेसारखी दुर्गावती दिसत होती. तिच्या सौंदर्याची कीर्ति सर्वत्र पसरली होती. लग्नाला अनुरूप झालेल्या आपल्या लाडक्या कन्येला पाहून किरतरायनें योग्य अशा राजपुत्राचा शोध केला. आणि राजपुतान्यांतील एका राजपूत राजकुमाराशीं दुर्गावतीचें लग्न ठरविलें.

### वीर वर वरण्याची मनीषा

चंदेल वंशांतला राजा किरतराय हा महोबा येथें राज्य करीत असतांना संग्रामशहाचा वडील मुलगा दलपतराय हा गढामंडला येथें राज्य करीत होता. आज ज्या शहराला आपण जबलपूर म्हणतों, तें शहर आणि आसपासचा प्रदेश

फार वर्षांपूर्वी अत्यंत मागासलेला होता. तेथें गोंड लोकांची वस्ती अधिक होतो. गोंड लोक द्रवीड समजले जात होते आणि अनार्य म्हणून ओळखले जात होते.

कोणे एके काळीं राजपुतांनीं या गोंड लोकांवर राज्य केलें होतें. मागाहून गोंड लोकांनीं संघटना केली आणि पुन्हा आपलें राज्य प्रस्थापित केलें. त्याचे चार विभाग होते. त्यांतला गढामंडला हा एक भाग मोंगल साम्राज्याला लागून होता. अकबर बादशहाच्या वेळीं गोंड-राज्य स्थापन होऊन सुमारें चार-पांचशें वर्षें झालीं असावींत. त्यांतील राजांत संग्रामशहा नांवाचा राजा सर्वांत पराक्रमी झाला. यानें आपल्या बुद्धीच्या आणि तलवारीच्या बळावर आसपासचे आणि दूरचे देश जिंकले आणि आपल्या अधिकाराखालीं आणले. संग्रामशहा गादीवर आला तेव्हां फक्त चार किल्ले त्याच्या ताब्यांत होते. परंतु मनगटाच्या जोरावर आणि साहसावर एकामागून एक असे किल्ले जिंकीत बावन किल्ल्यांचा तो राजा बनला. चौरागढ नांवाचा सर्वांत मोठा, मजबूत व प्रसिद्ध किल्ला यानेंच बांधला. आज ज्या शहराला आपण जबलपूर म्हणतों, त्याच्या ज़वळपास संग्रामशहाची राजधानो होती. चौरागढ किल्ला जबलपूर पासून फार तर दहा मैलांच्या अंतरावर आहे.

संग्रामशहाचा सर्वांत मोठा मुलगा दलपतराय हा अत्यंत पराक्रमी व शूर होता. सुदैवानें त्याला रूपहि मिळालें होतें.

चंदेल वंशांतील दुर्गावतीच्या रूपाची कीर्ति दलपतरायच्या प्रासादांत वाऱ्याच्या पालखींतून वरचेवर येत होती. ती ऐकून आपला विवाह दुर्गावतीशींच व्हावा असें दलपत-रायला वाटलें. तो स्वतः तिच्या सौंदर्यावर मोहित झाला. तसें पाहिलें तर दलपतराय दुर्गावतीपेक्षां सर्व गुणांनीं श्रेष्ठच होता. त्याच्या वडिलांनीं-संग्रामशहानें-विस्तृत राज्य त्याच्या स्वाधीन केलें होतें. भरपूर सैन्याचा तो मालक होता. त्याच्या सैन्यबळाची बरोबरी आसपासच्या प्रदेशां-तील कोणताहि राजा करूं शकत नव्हता. ईश्वरानें त्याला जेवढें रूप दिलें होतें, तितकेच गुणहि दिले होते. दलपत-रायच्या शौर्याच्या कथा दुर्गावतीला ऐकायला मिळाल्या होत्या. आणि तिनें अनेक वेळां स्वत.शीं म्हटलें होतें 'असा वीर वरच आपण वरावा.'

परंतु हें कसें शक्य होतें? दुर्गावती राजपुतांच्या चंदेल वंशांत जन्माला आली होती; तर दलपतराय हा शूर, पराक्रमी असला तरी गोंड जातीचा होता, म्हणजे द्रवीड-अनार्य होता. एका गोंड राजकुमाराला आपली पोटची कन्या द्यायला किरतराय काय मूर्ख होता ? असें करणें म्हणजे क्षत्रियकुळाचा मोठा अपमान होणार होता. आणि मग त्याचा बदला तलवारीनेंच घ्यावा लागला असता.

असें असूनहि दुर्गावतीच्या सौंदर्याचा मोह झालेल्या दलपतरायनें किरतरायकडे आपला दूत पाठवून तिच्याशीं

विवाह करण्याची मनीषा प्रगट केली. आणि असल्या धाडसाबद्दल दिलगिरी प्रदर्शित करतांना खलित्याद्वारें कळविलें....

> "....वरपांगी गढामंडलाचा राजवंश गोंड घराण्याचा दिसत असला तरी वास्तविक तसें नाहीं. गोंड घराण्याचा मूळ पुरुष यादवराय हा क्षत्रिय होता आणि ज्या स्त्री-पासून घराण्याचा वंशवृक्ष वाढला ती स्त्रीहि राजपूतच होती. तेव्हां मी दुर्गावतीशीं विवाह करण्याची मनीषा प्रकट करण्यांत आपला कोणताहि अपमान होत नसून गौरवच होत आहे......"

परंतु किरतरायला हा सगळा पोकळ युक्तिवाद वाटला. त्यानें दलपतरायला त्याचें जें उत्तर पाठविलें त्यांत केवळ नकारच होता असें नव्हे तर अपमानसूचक शब्दहि होते. हे शब्द दलपतरायला अर्थातच बाणासारखे खुपले. आणि या अपमानाचा वचपा कसा काढायचा हें ठरवीत असतांनाच एक आनंददायक गुप्त खलिता त्याच्या हातीं पडला.

## मुलखावेगळी विवाहेच्छा

दलपतरायसारख्या रूपवान, शूर, पराक्रमी राजकुमाराशीं आपला विवाह जुळत नाहीं हें पाहून दुर्गावतीची घोर निराशा झाली. वीराचें कौतुक वीरच करूं शकतो. वीरावर वीरच प्रेम करूं शकतो. दलपतरायच्या शौर्यकथा ऐकून दुर्गावतीनें आपल्या हृदयसिंहासनावर त्याची मूर्ति

केव्हांच बसविली होती. किरतरायनें ज्या राजपूत राजकुमाराशीं तिचा विवाह ठरविला त्याला दुर्गावतीनें स्पष्ट शब्दांत नकार देऊन दलपतरायशीं विवाह करण्याचा संकल्प पित्यासमोर प्रकट केला होता. दुर्गावतीचे सारे लाड किरतरायनें अगदीं मनापासून पुरविले होते. दुर्गावतीनें मागावें आणि राजानें मागितलेली वस्तू किंवा गोष्ट तिच्या पुढ्यांत साकार करावी, असेंच आजवर घडत आलें होतें. परंतु उच्च कुळांतल्या राजपूत कुमाराशीं ठरविलेला विवाह मोडून हीन गोंड जातींतल्या राजकुमाराशीं लग्न करायला तिला संमति देणें किरतरायला कसें शक्य होतें ? तो प्रतिष्ठेचा प्रश्न होता. लौकिकाचा प्रश्न होता. राजघराण्याच्या अब्रूचा प्रश्न होता.

परंतु बापाच्या विरोधाला शरण जाण्याइतकी दुर्गावती लेचीपेची नव्हती. तिनें आपल्या खास दूताहातीं एक खलिता परस्पर दलपतरायला पाठविला. आणि त्यांत विनवून म्हटलें....

'ही दुर्गावती आपल्या जन्माची सोबतीण व्हायला उत्सुक आहे. परंतु महोबाची राजकन्या आपली पत्नी व्हावी अशी इच्छा असेल, तर समरांगणांत तलवारीला तलवार लागणें अटळ आहे. आपल्या पराक्रमाच्या बळावरच आपण माझें पाणीग्रहण करावें.'

## मानापमानाचें निमंत्रण

किरतरायचे शब्द दलपतरायला बाणासारखे वाटले; पण दुर्गावतीचा खलिता म्हणजे प्राजक्ताची पखरण वाटली. एका खलित्यांत निषेध होता; दुसऱ्यांत स्वागत होतें. एकांत अपमान होता; दुसऱ्यांत बहुमान होता. माता-पित्यांचा आणि कुटुबियांचा विरोध दुर्गावतीला होता. दलपतरायनें दोन्हीहि निमंत्रणांचा स्वीकार केला. आणि समरांगणावर तलवार चालवून दुर्गावतीचें पाणीग्रहण करण्याचा निश्चय केला.

मोठ्या सैन्यानिशीं दलपतराय किरतरायवर चालून आला. दुर्गावतीच्या प्राप्तीसाठीं दलपतरायनें प्रयत्नांची आणि पराक्रमाची शिकस्त केली. कारण विजयश्री संपादन करणें तितकेंसें सोपें नव्हतें. दोन राजपूत राजांशीं लढून त्याला आपली प्रिय वधू मिळवायची होती. त्या घनघोर संग्रामांत राजपुतांनीं आपल्या शौर्याची पराकाष्टा केली. परंतु दुर्गावतीच्या ललाटीं पति म्हणून दलपतरायचें नांव लिहिलें होतें. म्हणून दलपतरायचा विजय झाला आणि तो त्या रूपसम्राज्ञीला बरोबर घेऊन आपल्या राजधानीला परत आला.

## राजपूत कन्येचा गोंड राजाशीं विवाह

गढामंडल्यास पोहोंचल्यावर दुर्गावतीचा राजा दलपतरायशीं फार मोठ्या समारंभानें विवाह झाला. गोंड

राजाला राजपूत कन्या मिळाल्यामुळें त्या राज्यांतील प्रजेला फार आनंद झाला. घरोघर दिवाळीइतका आनंद साजरा करण्यांत आला. चंदेल वंशांतील राजकन्या गोंड वंशाची महाराणी झाली. महाराणी दुर्गावतीला मनासारखा पराक्रमी पति मिळाल्यामुळें ती कमालीची सुखी झाली.

दलपतरायला शासनाच्या दृष्टीनें गढा ही राजधानी फारशी आवडली नाहीं, म्हणून त्यानें सिंगौरगढला आपली राजधानी नेली. यापूर्वी सिंगौरगढला हें महत्त्व प्राप्त झालें नव्हतें. त्यामुळें राजा-राणीसाठीं रहायला भव्य प्रासाद तेथें नव्हते. परंतु राजधानीचें महत्त्व प्राप्त झाल्यामुळें दलपतरायनें तेथें अनेक भव्य महाल बांधले. सुंदर बागा लावल्या. नवीन तलाव खोदले.

महाराणी दुर्गावतीचे दिवस अत्यंत सुखांत जाऊं लागले. आणि एक वर्षानंतर तिला मुलगा झाला. या मुलाचें नांव वीरनारायण असें ठेवण्यांत आलें. छोटा वीर नारायण आपल्या आईसारखें रूप घेऊन आला होता; आणि बापासारखी धष्टपुष्ट प्रकृति !

## आकाशींची कुऱ्हाड कोसळली

आपला पुत्र वीरनारायण बापासारखा पराक्रमी व साहसी निघावा असा निश्चय दुर्गावतीनें मनांत केला. मुलाला ती फुलांसारखी जपूं लागली. महिन्यांमागून महिने

उलटले. वर्षांचीं पावलें आणखी पुढें सरकलीं. त्याचप्रमाणें छोटचा वीर नारायणाचीं पावलेंहि हलके हलके राजवाडयांतील दालनांत धांवूं लागलीं, खेळूं लागलीं. १५४२ च्या सुमारास संग्रामशहाचा मृत्यु झाला. आणि दलपतरायला राज्यपद स्वीकारावें लागलें. दुर्गावतीच्या प्राप्तीसाठीं त्यानें १५४४ च्या अखेरीस महोबावर स्वारी केली आणि विजयश्री संपादन करून तिच्याशीं विवाह केला. पुढच्याच वर्षी म्हणजे साधारण १५४६ च्या सुमारास त्याला मुलगा झाला. पण दलपतरायनें फक्त चारच वर्षें वैवाहिक जीवन अनुभवलें आणि राज्यकारभारहि केवळ सात वर्षेंच केला. वीरनारायण तीन-चार वर्षांचा असतांना एक दिवस दलपतरायला अचानक मृत्यु आला. आपल्या प्रेमाच्या, साहसाच्या अनेक आठवणी, सुखद प्रसंग आणि एकुलता एक राजबिंडा पुत्र दुर्गावतीच्या हवालीं करून दलपतरायनें इहलोकाची यात्रा संपवली.

महाराणी दुर्गावतीवर अक्षरशः आकाशींची कुऱ्हाड कोसळली. दैवानें इतका कठोर प्रहार केला नसता तर आईच्या मायेंत आणि पित्याच्या छायेंत वीरनारायणाला चांगलें शिक्षण मिळालें असतें. तो बापापेक्षां अधिक महत्त्वाकांक्षी, पराक्रमी निघाला असता. आईसारखा मायाळू झाला असता. त्यानें फार मोठी कीर्ति संपादन केली

असती आणि गोंडवनाच्या सीमा अधिक विस्तृत झाल्या असत्या.

परंतु दलपतरायच्या अचानक मृत्यूनें गढामंडला राज्यावर दुःखाचा डोंगर कोसळला. बिचारी महाराणी दुर्गावती! तिच्या दुःखाला सीमा नव्हती. वीरनारायणसारख्या सुकुमार, अज्ञान राजकुमाराला सांभाळण्याची, त्याला वाढविण्याची जबाबदारी तिच्यावर पडली होती. जर तिच्या मागें तीन वर्षांचा राजबिंडा वीरनारायण नसता तर साहजिकच दुर्गावती दलपतरायबरोबर सती गेली असती. परंतु क्रूर काळाला तिच्याकडून आणखी कांहीं अलौकिक कार्य करवून घ्यायचें होतें.

दलपतरायच्या मृत्यूच्या दुःखानें पोळलेल्या दुर्गावतीनें वीरनारायणाला राज्यावर बसविलें. आणि त्याच्या नांवानें ती राज्यकारभार पाहूं लागली. आतां ती फक्त दोन गोष्टींसाठीं जगूं लागली. त्यांतली पहिली गोष्ट आपल्या पुत्राचा संभाळ करणें. त्याला बापापेक्षां कांकणभर जास्त शूर आणि महत्त्वाकांक्षी बनविणें. आणि दुसरी गोष्ट म्हणजे गढामंडला राज्याचें रक्षण करणें. राज्यांतील प्रजाजनांना दुर्गावतीनें मुलांसारखें मानलें होतें. त्यांना सांभाळण्याची, सुख देण्याची जबाबदारी तिनें स्वीकारली होती. दुर्गावती केवळ आपल्या वैयक्तिक दुःखांत चूर होऊन राहिली नव्हती.

या वैधव्यांतहि महाराणी दुर्गावतीनें राज्यकारभाराची धुरा तब्बल पंधरा वर्षें सांभाळली. या काळांत प्रजेचीं दुःखें दूर करायचा तिनें आटोकाट प्रयत्न केला. शत्रूंचा राज्यावर हल्ला होतांच प्रत्येक युद्धांत दुर्गावती स्वतः हातांत तलवार घेऊन आणि अंगांत चिलखत घालून लढली. ती कधीं घोड्यावर स्वार झाली होती तर कधीं हत्तीवर! समरांगणावर अग्रेसर राहण्यांत तिला मृत्यूची भीति वाटली नाहीं. उलट शिपायाचा वेश घेऊन ती शत्रूच्या गोटांत शिरली होती. न्याय मागण्यासाठीं आलेल्या कुठल्याहि व्यक्तीला तिनें परत पाठविलें नव्हतें. आपल्यांतील दयाळू वृत्तीनें तिनें प्रजेला सुख, शांति आणि समाधान देण्याचा आटोकाट प्रयत्न केला होता. यामुळें अर्थातच राणी दुर्गावती अत्यंत प्रजाप्रिय झाली होती.

दुर्गावतीच्या काळांत राज्यांत सर्वत्र सुबत्ता होती. सरकारी कर लोक सोन्याच्या नाण्यांनीं किंवा हत्तींच्या रूपानें देत. राणीजवळ अगणित जडजवाहीर होतें आणि चौदाशें हत्ती पण होते.

मात्र हें राजकीय कर्तव्य पार पाडीत असतांना दुर्गावतीनें खऱ्या आर्य स्त्रीप्रमाणें जोगिणीचें व्रत अंगिकारलें होतें. गढामंडला राज्याच्या उन्नतीसाठीं या कर्तव्यदक्ष स्त्रीनें आपल्या रक्ताचें पाणी केलें. सैन्यांत शिस्त निर्माण

केली. पायदळ, घोडदळ आणि हत्तीदळ असे त्याचे विभाग पाडले. परंतु हें सर्व करीत असतांना गढामंडल्याच्या शेजारीं मोंगल सम्राटाची सीमारेषा असल्यानें त्याला आपला उत्कर्ष सहन होणार नाहीं, याचीहि दुर्गावतीला पूर्ण कल्पना होती. तो सम्राट आपल्याला मांडलिकत्व स्वीकारायला भाग पाडील, नाहींतर आपलें राज्य गिळंकृत करील हेंहि त्या चतुर क्षत्राणीच्या लक्षांत आलें होतें. म्हणूनच दूरदर्शीपणानें तिनें सैन्यांत सुधारणा केल्या. त्या करीत असतांना प्रजेच्या हितासाठीं, सुखासाठीं आणि स्वास्थ्यासाठींहि अनेक उपयुक्त सोयी व सुधारणा केल्या. मोठमोठ्या रस्त्यावर विहिरी खोदल्या. कांहीं गांवांजवळ तलाव बांधले. प्रवाशांच्या सुखासाठीं धर्मशाळा बांधल्या.

दुर्गावतीच्या या कृत्यांनीं गढामंडला राज्यांतील प्रजाजन अत्यंत खूष झाले. आपल्या राणीविषयीं त्यांच्या मनांत आत्यंतिक आदर निर्माण झाला. तिला ते देवता मानूं लागले.

### आक्रमक अकबराचें दुष्टा राजकारण

दुर्गावतीची राज्यकारभारांतील निपुणता, तिनें केलेल्या प्रजाहिताच्या अनेक गोष्टी हलके हलके आसपासच्या राज्यांत पसरल्या. राणीची कीर्ति सर्व भारतांत दुमदुमूं लागली. दिल्ली दरबारांतील मोठमोठ्या सरदारांच्या कानावर दुर्गावतीच्या अनेक कथा आल्या. त्या ऐकून

कांहीं सरदारांच्या अंगाचा तिळपापड उडाला. कांहींचा संताप आपादमस्तक भिनला. 'कांहीं झालें तरी गढामंडलावर राज्य करणाऱ्या दुर्गावतीचा पराभव केलाच पाहिजे.' आणि 'तिचें राज्य मोगल साम्राज्यांत विलीन झालेंच पाहिजे.' अशा सूचना आणि तक्रारी अनेक सरदारांनीं अकबराच्या कानावर घातल्या.

त्यावेळीं दिल्लीच्या तख्तावर सम्राट अकबर राज्य करीत होता. या ना त्या रीतीनें सर्व लहान लहान राज्यें जिकून आपलें साम्राज्य वाढविण्याचा धडाका त्यानें सुरू केला होता. अल्पवयी मुलाला गादीवर बसवून एक स्त्री राज्यकारभार करीत असल्यामुळें हें राज्य आपणासारख्या बलाढ्य सम्राटाला हां हां म्हणतां जिंकतां येईल असें अकबराला साहजिकच वाटलें. त्याच्या अगोदरचे एक दोन बादशहा सोडले तर इतरांना दक्षिणेकडील राज्यें जिंकण्यांत यश मिळालें नव्हतें. तेव्हां हा सन्मान आपण मिळवावा असें अकबराच्या मनांत आलें. अर्थात त्याला कांहींतरी कारण हवें होतें.

असें म्हणतात कीं, महाराणी दुर्गावतीजवळ एक अत्यंत सुंदर असा पांढरा हत्ती होता. त्याचप्रमाणें अधारसिंह नांवाचा एक कायस्थ दिवाण होता. या दोन्ही गोष्टी अकबरानें दुर्गावतीजवळ 'भेट' म्हणून मागितल्या. परंतु राणीनें त्या देण्याचें साफ नाकारलें.

आणखी असेंहि सांगतात कीं, कांहीं दिवसांनीं सम्राट अकबरानें दुर्गावतीकडे सोन्याचा एक चरखा पाठविला. 'स्त्रियांचें काम चरखा फिरविण्याचें आहे, राज्य करण्याचें नव्हे. तें राज्य आमच्या स्वाधीन करावें' असा आशय अकबरानें राणीला त्या भेटीद्वारें कळविला होता. पण याला प्रत्युत्तर म्हणून दुर्गावतीनें अकबराकडे (ज्या साधनानें पिंजारी कापूस पिंजतात असा) सोन्याचा एक धुनक पाठविला. हेतु हा कीं, 'सम्राटाला कळावं कीं जातीनें आपण पिंजारी आहांत. आपण आपला मूळचा पेशा पत्करावा आणि राज्य करणें सोडून द्यावें.'

यांतील ऐतिहासिक सत्य किती कोण जाणे ! पण अकबराला आपल्या साम्राज्यविस्तारासाठीं एक कारण सांपडलें आणि त्यानें राणी दुर्गावतीवर स्वारी करण्याचा निर्णय घेतला. अकबराचा असफखान नांवाचा एक सरदार होता. तो कडा-मानिकपूर भागाचा सुभेदार होता. त्याच्या कानावर गढामंडलाच्या राणीची कीर्ति गेली होती. राणीच्या सौंदर्याचा लौकिक त्याला कळला होता. मोगल सम्राट अकबर राज्य करीत असतांना एका यौवनसंपन्न हिंदु विधवेनें सीमाप्रदेशांतील राज्यावर यशस्वीरीत्या राज्य करावें हें असफखानाच्या आसुरी मनाला डांचत होतें. अशा सुस्वरूप राणीचा पराभव करून तिला आपल्या जनानखान्यांत आणावें अशी प्रबल इच्छा त्याच्या मनांत

निर्माण झाली. हें त्या काळच्या मोगली राज्यकारभाराला शोभूनच होतें ! इतक्यांत याच कामगिरीवर आक्रमक अकबरानें असफखानाची नेमणूक केली व सहा हजार घोडदळ, बारा हजार पायदळ आणि प्रचंड तोफखाना देऊन त्याला गढामंडल्याचें राज्य जिंकण्यास फर्माविलें.

## समरांगणावरील अघटित

अशा प्रचंड फौजेनिशीं १५६४ सालीं असफखान सिंगौरगडवर चालून आला. एवढी मोठी फौज पाहून राणी दुर्गावती घाबरून जाईल आणि आपल्याला शरण येईल असें असफखानाला वाटत होतें. दुर्गावतीचा पराभव म्हणजे आपल्या हातचा मळ याच दिमाखांत तो होता. या युद्धांत आपला विजय होईल, राणी दुर्गावती जिवंत आपल्या हातीं लागेल, मग आपण अमाप लूट करून दिल्लीला परत जाऊं आणि दुर्गावतीला सम्राटासमोर उभी करून बहुमान मिळवूं, हें एकच चित्र असफखानाच्या डोळ्या-समोर पुनःपुन्हा येत होतें.

अकबराचा सरदार असफखान प्रचंड फौजेनिशीं चालून येत आहे हें राणी दुर्गावतीला दूताकडून कळलें. तें ऐकून ती संतप्त झाली. घाबरून गेलेल्या प्रजेला तिनें धीर दिला. 'वेळ पडल्यास मी माझ्या राज्यासाठीं समरांगणावर प्राणार्पण करीन पण अकबरासमोर वांकणार नाहीं' असा

निर्धार राणीच्या मनांत झाला. तिला आपल्या रणझुंजार पतीच्या पराक्रमाची, साहसाची आठवण झाली. कांहीं झालें तरी राजपुतांच्या कुळाला काळिमा लागतां कामा नये असें तिनें स्वतःला वारंवार सांगितलें. राणी दुर्गावतीला हिंदु धर्माचा आणि हिंदु संस्कृतीचा सार्थ अभिमान होता. रणांगणावर शत्रूशीं सामना करण्यापूर्वीं ह्या वीरपत्नीनें जनतेला उद्देशून जाहीर केलें :

"गढामंडल्याची राणी आज एका महान् सम्राटाच्या प्रचंड सैन्याशीं झुंज देणार आहे. या युद्धांत ती जिवाची पर्वा करणार नाहीं. त्याचप्रमाणें तिच्या प्रत्येक सैनिकानें वेळ पडल्यास प्राणार्पण करायला तयार झालें पाहिजे. तुमचे राजे दलपतराय हे अत्यंत पराक्रमी होते. रणझुंझार होते. त्यांचा आशीर्वाद आपल्या पाठीशीं असतांना आपला पराभव होणें कसें शक्य आहे ? आपण सारे जगलों तर गढामंडल्याच्या स्वातंत्र्यासाठींच जगूं आणि मरूं ते गढामंडल्याच्या स्वातंत्र्यासाठींच. माझा प्रत्येक सैनिक गढामंडल्याचा राजा असल्यानें, रक्षक असल्यानें तो तळहातावर शिर घेऊन झुंज देईलच."

राणी दुर्गावतीचें प्रजाप्रेम आणि स्वातंत्र्यप्रेम पाहून प्रजेच्या नेत्रांतून अश्रु वाहूं लागले. सर्व सरदारांनीं, सैनिकांनीं

आणि तरुणांनीं आणि वृद्धांनीं राणीचा संदेश शिरोधार्य मानला. त्यांनीं वीरश्रीनें म्यानांतून तलवारी बाहेर काढल्या आणि गर्जना केली—"महाराणी दुर्गावती की जय !"

या जयघोषानें सर्वांच्या अंगांत वीरश्री संचरली. ज्यांच्या बाहूंत बळ होतें ते सारे सैन्यांत जमा झाले. अगदीं थोडया अवधींत पंधराशें हत्ती, आठ हजार घोडेस्वार आणि मोठी पायदळसेना बरोबर घेऊन राणी दुर्गावती समरांगणावर येऊन ठाकली. शत्रूच्या समशेरींना समशेरी भिडल्या. त्यांचा खणखणाट रणांगणावर घुमूं लागला. दुर्गावतीच्या सैनिकांनीं अति त्वेषानें असफखानाच्या सैन्या-वर हल्ला केला. स्वतः महाराणी दुर्गावती हत्तीवर स्वार होऊन महिषासुरमर्दिनीसारखी मोगल सेनेवर तुटून पडली.

ज्या वेळीं असफखानानें शत्रूच्या सैन्यांत आणि महाराणी दुर्गावतीमध्यें असामान्य वीरश्री पाहिली तेव्हां तो थक्क झाला. त्याला जबरदस्त धक्का बसला. कडा-मानिकपूरहून निघतांना त्यानें जीं चित्रें मनःपटलावर चितारलीं होतीं, ज्या कल्पना उराशीं बाळगल्या होत्या, त्या अक्षरशः मातींत मिसळल्या गेल्या. पराजयाचा काळिमा पुसणें अशक्य झालें. राणीच्या सैनिकांजवळ फक्त तीर-कामठे, भाला, बरच्या आणि तलवारी इतकेंच युद्धसाहित्य होतें. परंतु असफखानाजवळ भक्कम तोफखाना होता. असें

असूनहि राणीच्या सैनिकांनीं तळहातावर शिर घेऊन शत्रूशीं झुंज दिली. मोगल सैन्याला पळतां भुई थोडी झाली. मोगल सैन्य जीव घेऊन पळत आहे हें पाहून राणीच्या सैनिकांनीं चौफेर हल्ला करून शत्रूची दाणादाण उडवून दिली; आणि पहिल्या दिवशीं राणी दुर्गावतीचा विजय झाला.

गढामंडल्याच्या एका तरुण विधवा राणीनें आपल्या अतुल पराक्रमानें सम्राट अकबराच्या सरदाराला रणांगणावर धूळ चारावी ही गोष्ट असामान्य होती. यापूर्वीं ज्या ज्या राज्यांवर अकबर बादशहानें स्वाऱ्या केल्या होत्या त्यांत त्याचा पराभव कधीं झाला नव्हता. ज्या समरांगणावर त्याची सेना लढायला उभी राही तिथें विजयश्री आपण होऊन दोन पावलें पुढें टाकून चालत येत असे. त्यामुळें पराभव कशास म्हणतात हें त्याला माहीत नव्हतें. दक्षिणेंतीलच नव्हे तर संपूर्ण भारतांतील राजांना जरबेंत ठेवणाऱ्या सम्राट अकबराच्या एका सरदाराचा एका स्त्रीनें पराभव करावा, हा त्याला मोठा कलंक होता !

समरांगणावर घडलेलें तें एक अघटित होतें. राणीला आपण सहज जिंकूं आणि जनानखान्यांत ठेवूं ही असफखानाची कल्पना खोटी ठरली. उलट एका स्त्रीकडून आपला पराभव झाला यामुळें तो फारच चिडला; आणि दुसऱ्या दिवशीं सकाळ होण्यापूर्वींच त्यानें फार मोठी फौज घेऊन राणीवर अचानक हल्ला केला. राणी दुर्गावतीचें सैन्य सावध असतें आणि युद्धाला सज्ज असतें तर

ह्याहि वेळीं मोगल सेनेला निश्चित हार खावी लागली असती. परंतु तिचें सैन्य आदल्या दिवशींच्या विजयामुळें बेसावध होतें. तें विश्रांति घेत होतें. शत्रूच्या अचानक हल्ल्यामुळें सैनिक गडबडले; पण दुर्गावती मात्र मुळींच घाबरली नाहीं. तिला आपल्या जातीचा, धर्माचा आणि देशाचा आत्यंतिक अभिमान होता. या तिहींच्या रक्षणासाठीं ती केव्हांहि सर्वस्व अर्पण करावयास तयार होती. कुठल्याहि मुसलमान बादशहासमोर शिर झुकविण्यापेक्षां आत्मसमर्पण करणें तिला प्यार वाटत होतें. म्हणून तिनें सैन्याला तशाच स्थितींत लढण्याचा हुकूम दिला.

'गढामंडल्याचें स्वातंत्र्य कीं अकबराचें मांडलिकत्व ?' असा सवाल टाकून तिनें आपल्या सैनिकांना आणि सरदारांना चेतविलें.

दुर्गावतीच्या त्या स्फूर्तिपर शब्दांनीं सैनिकांना त्वेष चढला. आपल्या एकुलत्या एक नारायणाला बरोबर घेऊन दुर्गावती रणांगणावर आली. त्या दिवसाचा संग्राम भयंकर होता.

## दुर्दैवानें डाव साधला !

कांहीं झालें तरी दुर्गावतीचा पराभव करावयाचा आणि मगच दिल्लीला तोंड दाखवायचें या ईर्षेनें असफखान लढत होता आणि सैनिकांना उत्तेजन देत होता. उलट 'रक्ताचा अखेरचा थेंब असेपर्यंत गढामंडल्यासाठीं लढत रहा,

मारा किंवा मरा,' असे दुर्गावतीचे वीरश्रीचे उद्‌गार सैनिकांच्या कानीं पडत होते. त्या दिवशींचा राणी दुर्गावतीचा पराक्रम पाहून समरांगणावर जणूं महाकालीनेंच अवतार घेतला कीं काय असें वाटत होतें. राणीच्या चेहऱ्यावरील तेज आणि धीरगंभीर वृत्ति पाहून मोगल सैनिकांनाहि तिच्याबद्दल आदर वाटला, कौतुक वाटलें.

बलाढ्य शत्रुसैन्याला दुसऱ्याहि दिवशीं राणी दुर्गावतीनें धूळ चारली असती. परंतु दुर्दैवानें ऐन वेळीं असफखानाला नव्या तोफ़खान्याची मदत मिळाली आणि युद्धाला अचानक वेगळें वळण लागलें.

तोफांच्या भडिमारामुळें राणीच्या सैनिकांचा धीर खचत चालला. त्यांचा टिकाव लागेनासा झाला. हत्तीवर बसलेली राणी शत्रूवर बाणांचा वर्षाव करीत होती. इतक्यांत शत्रूकडून आलेला एक तीर दुर्गावतीच्या डोळ्यांत शिरला. झालें! दुर्भाग्यानें तिचा घात केला. विजयश्री एकदम तिला पाठमोरी झाली. जयाचें पराजयांत रूपांतर झालें. डोळ्यांत शिरलेला तीर काढण्याचा तिनें प्रयत्न केला. पण त्याचें टोंक डोळ्यांतच राहिलें. एवढ्यावरच दुर्दैवाचें क्रूर हास्य थांबलें नाहीं. शत्रूनें सैन्यांत फितुरी केली आणि 'वीरनारायण लढतां लढतां मारला गेला' असें कोणीतरी राणी दुर्गावतीला येऊन सांगितलें. तें ऐकून राणीच्या हृदयाचे शतशः तुकडे

झाले. तीर लागल्यानें तिचा एक डोळा कायमचा गेला होता आणि पुत्राच्या मृत्यूनें आतां तिच्यासमोर काळोख पसरला होता. आपण कुठें आहोंत आणि काय करीत आहोंत याचें तिला भान राहिलें नाहीं. पण कांहीं क्षणांनीं तिनें स्वतःला सावरून घेतलें; आणि पुन्हा प्राण पणाला लावून लढायला तिनें सुरुवात केली.

ज्या ठिकाणीं तिचे सैनिक लढत होते, त्याच्यामागें एक नदी होती. युद्धाला प्रारंभ झाला तेव्हां तिचें पात्र अगदीं कोरडें ठणठणीत होतें. परतु लढाई ऐन रंगांत आली असतांना तिला एकाएकीं महापूर आला आणि राणीच्या नशिबानें पूर्णपणें दगा दिला. एकीकडून मोगलांची अफाट सेना दुर्गावतीच्या सैन्यावर तुटून पडली होती; आणि मागल्या बाजूनें महापुरानें नदी अक्राळविक्राळ रूप घेऊन वाहत होती. त्यामुळें आपल्या सैन्याचा नाश उघडचा डोळचांनीं पाहण्याखेरीज दुर्गावतीला अन्य मार्ग नव्हता. हें लक्षांत येतांच माहुतानें दुर्गावतीला म्हटलें, “सरकार, आतां जयाची आशा करणें व्यर्थ आहे. उलट प्राण वांच-विण्याचा प्रयत्न केला पाहिजे. क्षणाचाहि विलंब न करतां आज्ञा करीत असाल तर अशाहि पुरांतून मी हत्तीवरून आपणांस पैलतीराला नेईन आणि आपले बहुमोल प्राण वांचवीन.”

परंतु माहुताच्या विनंतीला दुर्गावतीनें स्पष्ट नकार दिला. ती म्हणाली, "मी एका पराक्रमी शूराची पत्नी आहें. समरांगणांतून पळ काढण्याचा काळिमा माझ्या पतीनें स्वतःच्या चारित्र्याला कधींहि लावला नाहीं. मग मी तो कसा लावूं ? एक तर मी शत्रूचा नाश करीन, नाहींतर मी इथेंच मरेन !"

असें ती म्हणत आहे तोंच आणखी एक बाण राणी दुर्गावतीला गळ्याजवळ लागला आणि ती पुरतीच घायाळ झाली. राणीची ती अवस्था पाहून सैन्याचा धीर पुरता खचला. या संधीचा पुरेपूर फायदा घेऊन मोगल सैन्यानें चहूंबाजूंनीं चढाई केली. जखमी दुर्गावती मृत्यूच्या दाढेंत उभी असतांहि तिला भीति वाटली नाहीं. कालिकेसारखें उग्र रूप तिनें धारण केलें आणि मोगल सैन्यावर ती तुटून पडली. अत्यंत कठोर होऊन तिनें शत्रूच्या सैनिकांना कापायला सुरवात केली. परंतु असफखान आपणांस जिवंत पकडण्याचा प्रयत्न करीत आहे असें दुर्गावतीच्या लक्षांत येतांच तिनें माहुताजवळचा खंजीर घेतला आणि स्वतःच्या पोटांत खुपसला. शत्रूच्या भ्रष्ट हातांचा स्पर्श जिवंत देहाला होण्यापूर्वींच दुर्गावतीनें वीराचें, वीरपत्नीचें मरण पत्करलें. गढामंडल्याच्या स्वातंत्र्यरक्षणासाठीं तिनें प्राणार्पण केलें.

**स्मारक**

बरेलीजवळ ज्या ठिकाणीं महाराणी दुर्गावतीनें स्वतःला कट्यारीनें भोसकून घेतलें आणि ती हत्तीवरून खालीं

कोसळली तिथें एक चबुतरा बांधण्यांत आला आहे. त्या चबुतऱ्याजवळून जाणारा प्रत्येक माणूस एक छोटा पांढरा शुभ्र दगड दुर्गावतीच्या समाधीला अर्घ्यरूपानें अर्पण करतो. दुर्गावतीच्या धवल कीर्तीचें तो स्मरण करीत असतो.

महाराणी दुर्गावतीच्या जीवनाची ही कहाणी म्हणजे एक अलौकिक वीरपत्नीचा उत्कृष्ट आदर्श आहे. विवाहापासून तर मृत्यूपर्यंत तिनें वीरपत्नीव्रताचें पालन केलें. परंतु केवळ युद्धांत आणि शासनांतच दुर्गावतीची ख्याति होती असें नव्हे, तर राजधानींत आणि इतर मुख्य नगरांतहि तिनें कितीतरी प्रजोपकारी गोष्टी केल्या. जबलपूर शहराजवळ अर्ध्या मैल लांबीचा व तितक्याच रुंदीचा 'रानीताल' नांवाचा जो तलाव आहे तो दुर्गावतीनेंच बांधला. या जलाशयाभोंवतीं तिनें अनेक मंदिरें बांधलीं. 'चेरीताल' नांवाचा तलाव दुर्गावतीच्या दासीनें बांधला असें म्हणतात. नरसिंहपूरच्या ब्राह्मणघाटावर जें दुर्गावतीचें एक मंदिर आहे, तें तिच्याच नांवाचें आहे. गोंडकालीन कलेची ती एक खूण आहे.

या सर्वांवरून दुर्गावतीच्या मोठेपणाचें निदान करतां येतें. ज्या काळांत दुर्गावतीनें हा लौकिक संपादन केला तो काळ असा होता कीं, चांगल्या चांगल्या शूरवीर पुरुषांची स्थिरता नष्ट झाली होती. आक्रमक मोगली राज्यकर्त्यांकडून छळाचा—विटंबनेचा सर्रास उपयोग होत होता.

स्वार्थतृप्तीसाठीं कोणत्याहि अनिष्ट मार्गाचा अवलंब केला जात होता. अशा काळांत दुर्गावतीसारख्या एका विधवा स्त्रीनें सतत पंधरा वर्षें यशस्वीपणें एक मोठें राज्य सुरळीतपणें चालविलें. इतकेंच नव्हे तर आक्रमण करणाऱ्यांना आपल्या तिखट तलवारीचें पाणी पाजून पराक्रमाबद्दल प्रशंसा मिळविली होती. अकबरासारख्या कूटनीतिज्ञ बादशहाच्या चक्रव्यूहांतून बाहेर पडणें सर्वसाधारण स्त्रीच्या कक्षेंतली गोष्ट नव्हती. दुर्गावतीसारखी एखादीच वीरांगना असलें दिव्य करूं शकली. म्हणून लोक दुर्गावतीला साक्षात् दुर्गेचा अवतार समजत. गढामंडल्याच्या आसपासच्या गांवांतील जनता अजूनहि त्या नदीला दूषण देते. युद्धापूर्वीं जी नदी अगदीं कोरडी ठणठणीत होती, तिला युद्ध सुरू होतांच महापूर यावा आणि दुर्गावतीला आपलें जीवन समाप्त करणें भाग पडावें हा एक दैवदुर्विलासच समजतात. या दैवदुर्विलासानेंच गढामंडल्याचें बहुमोल रत्न कायमचें हरपलें.

राणी दुर्गावतीच्या पराक्रमाची रोमांचकारी कहाणी ऐकून अकबर बादशहाहि थक्क होऊन गेला म्हणतात. आज चारशें वर्षांनंतरहि राणी दुर्गावतीच्या पराक्रमाचीं, साहसाचीं आणि कीर्तीचीं गाणीं बुंदेलखंडांतील घराघरांत गायिलीं जातात.

☩ ☩ ☩

म. ग्रं. सं. ठाणे, ... शाखा.
वा. क्र. १२५६ दि. 20/5/79
विषय वा.वा. क्र. ...

BVBK-0401256
BVBK-0401256

# कांहीं तरी नवेंच करा

जीवनाची ठराविक चाकोरी सोडून—'कांहीं तरी नवेंच' करण्याची ईर्षा बाळगली आणि तत्सिद्ध्यर्थ विशिष्ट जीवनक्षेत्रात अलौकिक कर्तृत्व केलें अशांची चरित्रें.

तीस मिनिटांत वाचून होणारीं पुस्तकें : शालेय-वर्गग्रंथालयासाठीं योजना

१. असा असतो देशभक्त : कोतवाल
२. गुलाम बंड करतो : स्पार्टकस
३. रा. शिक्षणाचा ध्यास : विजापूरकर
४. कादंबरीकार हरीभाऊ : आपटे
५. मराठी नटसम्राट : गण. जोशी
६. व्यायाम भीष्माचार्य : माणिकराव
७. लष्करी संघटक : क. लॉरेन्स
८. अलौकिक शिल्पकार : एंजलो
९. चित्रपट महर्षि : दादासाहेब फाळके
१०. इतिहासाचार्य राजवाडे : राजवाडे
११. बंदीजनांची माउली : फ्राय
१२. देशासाठीं दर्यापार : जेम्स कुक
१३. वीरबाला झोया : ( रशिया )
१४. बहादूर शिकारी : जिम कॉर्बेट
१५. कोई बी चीज उठाव : वुलवर्थ
१६. वीरपत्नी राणी दुर्गावती :
१७. विख्यात वकील : बॅ. जयकर
१८. विलक्षण वार्ताहर : अर्नेस्ट पाइल
१९. भारतीय चित्रकार : रविवर्मा
२०. मराठी मुद्रण-प्राणदाता : जावजी
२१. राजमाता जीजाबाई
२२. स्वदेशी कारखानदार : अंताजी काळे
२३. भव्य स्थापत्य : फर्डिनांड द लेसेप्स
२४. सर्कसबहाद्दर : विष्णुपंत छत्रे
२५. भक्तिवेडी बहिणा : बहिणाबाई

२६. सद्‌गुणी बनण्याची कला : फ्रँकलिन
२७. भारत-कवि टागोर : रवींद्रनाथ
२८. कोशकार केतकर : डॉ. केतकर
२९. कृषिपंडित : दादासाहेब शेंबेकर
३०. खरा खेळाडू : पी. बाळू
३१. चिरंजीव मरण : मदनलाल धिंग्रा
३२. विमामहर्षि : अण्णासाहेब चिरमुले
३३. तेजस्वी धर्मोद्धारक : शंकराचार्य
३४. बंडखोर लोककवि : अनंत फंदी
३५. साकार संगीत : पं. पलुस्करबुवा
३६. साहसी वैमानिक : सँटा ड्युमाँ
३७. दरियाचा राजा : कान्होजी आंग्रे
३८. जमिनीचा जादूगार : डॉ. कार्व्हर
३९. लाखांचा प्राणदाता : लुई पाश्चर
४० शिक्षण-भगीरथ : भाऊराव पाटील
४१. मराठी-मुद्रक : गणपत कृष्णाजी
४२. बर्फातला माणूस : हिलरी
४३. प्राणावरचा प्रवास : शिफले
४४. दानशूर कुबेर : रॉकफेलर
४५. प्रवासी पंडित : ह्युएनत्संग
४६. नृपनिर्माता : आर्य चाणक्य
४७. असामान्य क्रिकेटपटु : ब्रॅडमन
४८. लोकहिताचा संरक्षक : वि. पटेल
४९. पहिला मिशनरी : गजाननराव वैद्य
५०. तुम्हांला कोण व्हावेंसें वाटतें ?

प्रत्येक पुस्तक पन्नास नये पैसे : संच पेटी रु. २५.

व्होरा अँण्ड कंपनी पब्लिशर्स प्रायव्हेट लिमिटेड, मुंबई २.